महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३९

# सयाजीराव चारित्र्यवान निर्व्यसनी सार्वभौम राजा

बाबा भांड



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३९

# सयाजीराव चारित्र्यवान निर्व्यसनी सार्वभौम राजा

बाबा भांड

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

सयाजीराव चारित्र्यवान
निर्व्यसनी सार्वभौम राजा
इतिहास
बाबा भांड
●
प्रकाशन क्रमांक - ५९
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : बाबा भांड (सचिव)
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : १९ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# सयाजीराव एक चारित्र्यवान, निर्व्यसनी सार्वभौम राजा

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात थोरल्या बाजीरावांच्या मराठी सेनेने दिल्लीपर्यंत धडक मारली होती. त्यावेळी मराठ्यांचे सेनापती खंडेराव दाभाडे यांनी गुजरातेतील मोगलांना थेट काठीवाडपर्यंत मागे रेटण्याचे शौर्य गाजविले. तेव्हा त्यांच्यासोबत दमाजीराव गायकवाड हे मराठी सरदार होते. ते पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील भरे गावचे. पुढे ते खेड तालुक्यातील दावडी गावी आले. नंदाजी त्यांचा मूळ पुरुष. ते भोर संस्थानात किल्लेदार होते. राक्षसभुवनच्या लढाईत इ.स. १७२० साली मराठ्यांनी निजामाचा पराभव केला. मराठी सेनेसोबत नंदाजीचा नातू दमाजी गायकवाडही होते. दमाजीची बहादुरी बघून शाहू महाराजांनी दमाजीस समशेर बहादूर किताब दिला. यानंतर खंडेराव दाभाडे या मराठी सेनापतींनी गुजरातेतील मोगलांना काठेवाडपर्यंत मागे रेटण्याचे शौर्य गाजविले. त्यावेळी त्यांच्यासोबत होते दमाजीराव गायकवाडांचा मुलगा पिलाजी. पिलाजीरावाने मोगलाकडील सोनगड इ.स. १७२० मध्ये

काबीज केले. डोंगरावर किल्ला बांधला. गायकवाड घराण्याची गुजरातेत सत्ता सुरू झाली. पुढे पिलाजीने गुजरातेत बडोदेपर्यंत मराठी सत्ता वाढविली आणि बडोदे संस्थानात गायकवाड यांची राजवट सुरू झाली.

सातासमुद्रापलीकडील इंग्रजी व्यापारी हिंदुस्थानात त्याकाळात व्यापारासाठी येऊ लागले. या कामासाठी ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करून कंपनीने हिंदुस्थानात समुद्रकिनारी हळूहळू जम बसविला. तसाच विस्तारही गुजरातेत होऊ लागला. गायकवाड यांची ही सत्ता गुजरातेत वाढत होती. या दोन्ही सत्तेत प्रसंगी संघर्ष सुरू झाला. इ.स. १७७९ रोजी पेशव्यांची गुजरातेत इंग्रजी ईस्ट इंडिया कंपनीशी लढाई झाली. त्यावेळी बडोद्याचे तत्कालीन राजे फत्तेसिंह गायकवाडांनी ब्रिटिश जनरल गार्ड यांच्याशी हुशारीने मैत्रीचा हात पुढे केला. पेशव्याविरुद्ध एक मराठी सरदार आपणास मदत करतोय, हे मुत्सदी ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी ओळखले. एक देशी मासा गळाला लागतोय, ही संधी ओळखून बडोदा संस्थानाशी दोस्तीचा व सहकार्याचा हात पुढे केला.

## बडोदा - ईस्ट इंडिया कंपनीशी मैत्रीचा करार :

बडोद्याचे राजे आनंदराव गायकवाड आणि ईस्ट इंडिया कंपनीने ६ जून १८०२ रोजी मैत्रीचा करार केला. यावेळी बडोद्याला दिवाण होते रावजी अण्णाजी फणसे. या कराराने बडोदा सरकार आणि ईस्ट इंडिया कंपनी मित्र झाले. पुढे

पानिपतच्या लढाईनंतर ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकार ब्रिटिश सरकारने हाती घेतले. यात मूळ १८०२ चा करार, आहे तसा स्वीकारला. मुंबईचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन २ एप्रिल १८२० रोजी बदोद्यात आले. त्यावेळी सयाजीराव दुसरे यांना गर्व्हनर म्हणाले, 'मी तुम्हास राज्यकारभार स्वतंत्रपणे करण्याची संपूर्ण सत्ता देण्यासाठी आलो आहे.' यापूर्वी इ.स. १८१८ ला मराठेशाहीचा पाडाव होऊन देशभर ब्रिटिश सरकारची सत्ता सुरू झाली होती. इ.स. १८५७ ला ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता ब्रिटिश सरकारकडे आली होती. देशभरातील लहानमोठी ५६५ संस्थाने ब्रिटिश सरकारचे मांडलिक झाले होते. पण इ.स. १८०२, इ.स. १८१८ चा बडोदा व ब्रिटिश यांच्यातील मैत्रीचा मूळ करार आहे तसाच स्वीकारला गेला होता. याचा अर्थ बडोदा ब्रिटिश सरकारचे मित्र होते.

## बडोदा गादीस वारस शोधणे :

बडोदा येथे खंडेराव गायकवाड राजा होते. महाराणी जमनाबाईस मूलबाळ नव्हते. दुर्देवाने अल्पशा आजाराने इ.स. १९७० मध्ये खंडेरावांचे निधन झाले. त्यांचे बंधू मल्हारराव गादीवर आले. यावेळी खंडेरावांच्या पत्नी जमनाबाई गरोदर होत्या. मल्हाररावात राज्य सांभाळण्याचे गुण नव्हते. त्यांनी खंडेरावाच्या जवळच्या माणसांचा छळ सुरू केला. मल्हाररावाने रयतेचा जुलूम - छळ सुरू केला. अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचार वाढला. मधल्या काळात जमनाबाई प्रसूत होऊन

कन्यारत्न झाल्याचे बघून मल्हाररावांना अत्यानंद झाला. चार वर्षे बडोद्यात बेबंदशाही माजली, महाराणी जमनाबाई गव्हर्नर जनरलकडे तक्रार करत होत्या. शेवटी १३ जानेवारी १८७५ ला मल्हाररावांना ब्रिटिश सरकारने पदच्युत केले. जमनाबाईंना दत्तकपुत्र घेण्याची परवानगी दिली. तो दत्तक मात्र गायकवाड वंशाचा असावा आणि किशोरवयीन असावा, अशी घट घालण्यात आली. बडोद्यात गायकवाडांची चार मुले होती; पण त्यातील एक तीस, दोन अठ्ठावीस अन् चौथा पंचवीस वर्षांचे होते. जमनाबाई त्यावेळी बावीस वर्षांच्या होत्या. त्यामुळे बडोद्याबाहेरच्या गायकवाडांचा शोध घेतला. मालेगाव जवळच्या कवळाणे गावात पानिपतच्या युद्धानंतर प्रतापराव गायकवाडांच्या पिढीतील काशीराव शेती करत होते. ही माहिती नाशिकच्या कलेक्टरनी मिळवली. कवळाण्याच्या चार मुलापैकी गोपाळ दत्तकपुत्र म्हणून निवडल्या गेला. २७ मे १८७५ रोजी गुरुवारी दत्तक विधान व राज्यारोहण होऊन सयाजीराव तिसरे या नावाने राजा बनले.

अक्षरओळख नसलेल्या या राजाला लिहिणे, वाचणे, राजकारभाराचे शिक्षण सुरू झाले. केशवराव पंडित, भाऊ मास्तरांनी राजाचे शिक्षण सुरू केले. दिवाण टी. माधवरावांनी गव्हर्नरांकडे इंग्रजी शिक्षकाची मागणी केली. वर्हाड प्रांतातील शिक्षण खात्याचे संचालक मि. एफएएच इलियट या तरुण अधिकाऱ्याची नेमणूक झाली. १० डिसेंबर, १८७५ ला बदोद्यात

रुजू झाले. इलियट उत्साही होते. त्यांच्या प्रसन्न चेहऱ्यावर बृद्धिमत्तेची झाक होती. आल्या आल्या त्यांनी सहकारी शिक्षकाच्या मदतीने सयाजीरावाच्या अभ्यासक्रमाची आखणी केली. ब्रिटिश पब्लिक स्कूलच्या धर्तीवर आराखडा तयार केला. बारा वर्षांच्या सयाजीरावाची नवे शिकण्याची जिद्द, समजून घेण्याची चिकाटी बघून इलियट गुरुजींना समाधान झाले. या हिऱ्याला विविध पैलू पाडण्याचे काम सहा वर्षांत केले. अक्षर-अंकओळखीतून एक संवेदनशील किशोरवयीन राजा घडत गेला.

## बडोदा सार्वभौमत्वाचे बीजारोपण :

अठराव्या वर्षी बडोदा राज्यकारभार हाती आलेल्या सयाजीरावांना गुरुवर्य एलियट यांनी बडोदा राज्याचा पूर्ण इतिहास नीट समजावून सांगितला. पेशव्याविरुद्ध आपणास मदत करणाऱ्या गायकवाडांशी ईस्ट इंडिया कंपनीने बडोदा संस्थानशी दोस्तीचा व सहकार्याचा हात पुढे केला. यातून ६ जून १८०२ रोजी ईस्ट इंडिया कंपनी व बडोदा राजे आनंदराव गायकवाड यांच्यात मित्रत्वाचा करार केला गेला. या कराराने ब्रिटिश कंपनी आणि बडोदा मित्र झाले. या करारात दोन तीनदा भर घालून इ.स. १८१८ ला तो कायम केला. यातील दोन गोष्टी महत्त्वाच्या होत्या. बडोदा हे सार्वभौम पण ब्रिटिशांचे मित्र झाले. हिंदुस्थानातील लहान मोठी ५६५ संस्थाने ब्रिटिश सरकारचे मांडलिक झाले; पण बडोदा सरकार मूळ कराराप्रमाणे ब्रिटिशांचे सार्वभौम मित्र राहिले. ही गोष्ट गुरुवर्य इलियट यांनी

महाराजा सयाजीराव यांच्या मनावर पक्के बिंबविल्यामुळे या राजाने आयुष्यभर बलाढ्य ब्रिटिश सत्तेशी संघर्ष करत स्वातंत्र्ययोद्ध्याचे ते पाठीराखे झाले. सयाजीराव हे सार्वभौम राजा आहेत हे पुढे इ.स. १८१२ साली लंडन हायकोर्टाने आणि तेथील सुप्रीम कोर्टाने एका निवाड्यात जाहीर केले, ही रंजक गोष्ट सयाजीरावांचा ते चारित्र्यवान राजा हा दुसरा पैलू दाखवून देते.

## जनसेवा आणि गरजूंच्या दानधर्मातच मोक्ष शोधणारा राजा :

स्वातंत्र्यपूर्व काळात रयतेच्या पैशावर हौस मौज आणि ऐश्वर्याची पोळी भाजणाऱ्या राजांचीच फार मोठी संख्या होती; पण त्यात अपवाद असणारे होते सयाजीराव. या दूरदर्शी राजाने महसूल वसूलीकडे जसे लक्ष दिले, त्याहून अधिक लक्ष राजवाडा, आजूबाजूच्या खानगी खर्चात काटकसर करून राज्याचा कोश वाढविला. त्यामुळेच काही लाखाच्या तोट्यात असलेले बडोदा पंचवीस वर्षात जगात सातव्या क्रमांकाचे श्रीमंत झाले. या श्रीमंतीचा उपयोग जनतेला शिक्षण, आरोग्य, शेती उद्योगास जेवढी मदत केली, त्याहून देशभरातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देत मदत केली. यातील विद्यार्थी आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे सारखे हजारो विद्यार्थी. या विद्यार्थ्यांना ८९ कोटी रुपयांची शिष्यवती देणारे महाराजा सयाजीराव एकमेव दानशूर राजा होते. एवढेच

नाही तर आपल्या अस्पृश्य-वंचित समाजाच्या उत्थानासाठी हिंदुस्थानात कायदा करून अंमलबजावणी करणारे सुप्रशासक होते. साहित्य, कला, संगीत, शिल्पकला ही राष्ट्राची संपत्ती आहे. या संपत्तीचे संवर्धन करणे राजाचे कर्तव्य समजून शेकडो कलावंत साहित्यिक, गुणवंतांना मदत करून ते सांस्कृतिक वारशांचे पोशिंदे झाले. राजाने स्वत: शिकून जनकल्याणाचा ध्यास घेतला तरच जनतेला मदत मिळू शकेल, हे ओळखणारे सयाजीराव स्वत: प्रज्ञावंत राजा होते. लक्ष्मी अन सरस्वती एका ठिकाणी गुण्या गोविंद्वाने कल्याणासाठी उपयोग करणारे छत्रपती शिवरायानंतरचे एकमेव राजा होते.

## सयाजीराव चारित्र्यवान, निर्व्यसनी, सार्वभौम राजा :

सयाजीराव हे निर्व्यसनी आणि चारित्र्यवान राजा होते. ज्या काळात भारतीय राजाराजवाडे रयतेच्या पैशात अन् त्यांच्या सत्तेच्या ऐशात बाई, बाटलीत आपल्या ऐश्वर्याचे उधळण करीत होते, त्यावेळी सयाजीराव या मोहापासून दूर राहून जनसेवेतच आपला मोक्ष शोधत होते. लंडन येथे हौसमौज करायला येणाऱ्या राजे मंडळींना या मोहात गुंतवण्याचे काम ईमेस्ट इमॅन्युअल स्टॅथम पत्नीच्या मदतीने करीत असे. याने पत्नीला सयाजीरावाच्या मागे लावले. या स्त्री मोहाच्या जाळ्यात सयाजीराव अडकले नाही, गिऱ्हाईक हातचे जातेय या भावनेने चिडलेल्या स्टॅथमने सयाजीराव यांना वकिलाच्या मार्फत नोटीस पाठवली. त्यात लिहिले, ‘‘आपले माझ्या पत्नीशी

अनैतिक संबंध आहेत. याबद्दल मी सिव्हिल न्यायालयात अर्ज करून, डायव्हर्स मागणी करणार आहे. या प्रकरणात आपली बदनामी नको असल्यास एवढे हजार पौंड रक्कम देऊन तोड काढूया.'' सयाजीराव या चारित्र्यहननाच्या धमकीला घाबरले नाही. ते म्हणाले, ''तुला काय करायचे ते कर.'' स्टॅथमने लंडनच्या सिव्हिल न्यायालयात पत्नी विरुद्ध घटस्फोटाचा दावा दाखल केला. पत्नी आणि सयाजीरावांचे अनैतिक संबंध असल्याने, मला तिच्याकडून घटस्फोट मिळावा. न्यायालयाने सयाजीरावास नोटीस पाठविली. नोटीस मिळताच ते आपल्या वकिलास म्हणाले, 'न्यायालयात अर्ज करा. बडोदा गायकवाड हे सार्वभौमराजे असून त्यांच्या विरुद्ध जगात कोणत्याही कोर्टात दावा दाखल करता येत नाही. वकिलांनी न्यायालयात तसा अर्ज केला. सिव्हिल न्यायाधीशांनी हे घटस्फोटाचे प्रकरण उच्च न्यायालयात वर्ग केले. लंडन हायकोर्टाने ब्रिटिश सरकारला आणि गायकवाड यांना नोटिसा काढल्या. महाराजा सयाजीराव यांच्या वकिलांनी हायकोर्टात अर्ज केला, ''महाराजा सयाजीराव गायकवाड हे सार्वभौम राजा आहेत. लंडनच्या नागरी कायद्याने त्यांना बाधा करू शकत नसल्याने पुढील कार्यवाही करता येणार नाही.''

लंडन न्यायालयाने केस क्र. ९२ ब्रिटिश सरकारला आदेश काढून लंडन येथील इंडिया ऑफिसमधील बडोदा व ब्रिटिश सरकारच्या संबंधाची कागदपत्रे सादर करण्याचे फर्मान काढले. इंडिया ऑफिसने भारतातील व्हाईसरॉयच्या सल्लागार समितीकडे कागदपत्रांची मागणी केली. लंडनहून कलकत्ता कार्यालयाकडे तारांचा भडिमार सुरू होऊन बडोदा संबंधाने राजकीय वादळ घोंगावू लागले. लंडन आणि भारतातील कार्यालयाकडे कागदपत्रे आली. ब्रिटिश सत्तेच्या दीर्घकाळात एखादा राजा आणि ब्रिटिशसत्तेचा संबंध यासंदर्भात प्रश्न निर्माण झाला होता. महाराजा सयाजीरावांनी त्यांच्याकडील कागदपत्रे दाखल केली. एकशेब्याण्णव वर्षांच्या इतिहासात प्रथमच बडोदा आणि ब्रिटिश सत्तेच्या संबंधाचा प्रश्न निर्माण झाला होता. ब्रिटिश सरकार नि:स्पृह न्यायदेवतेची ती कसोटीच होती. लंडन हायकोर्टाचे न्यायाधीश सी मॉन्टेग्यू लश यांनी तटस्थपणे सर्व कागदपत्रे तपासून न्याय दिला; 'बडोद्याचे गायकवाड हे सार्वभौम राजा असून, त्यांच्याविरुद्ध लंडन हायकोर्टात नागरी कायद्याअंतर्गत कारवाई करता येणार नाही.' या निर्णयाने व्हाईसरॉय आणि लंडनमधील वरिष्ठ कार्यालय हादरले. ब्रिटिश सरकारने वरिष्ठ न्यायालयात विनंती अर्ज केला. अपेलिएट जज, न्यायमूर्ती बारग्लेअर डीन यांनी हायकोर्टाचाच निर्णय कायम ठेवला.

बडोद्याचे सयाजीराव गायकवाड हे सार्वभौम राजा आहेत.

छत्रपती शिवरायांच्या बहादूर मावळ्यांनी ७५ टक्के हिंदुस्थानवर शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याची पताका शौर्याने फडकावली, परंतु आपसातील भाऊबंदकी अन् शत्रुपक्षास मदत करत इ.स. १८१८ ला मराठेशाही एकशे अडतीस वर्षांत बुडाली. शिवरायांचे हिंदवी स्वराज्याचे स्वप्न झाकोळले. शिवरायांनी अनेक मराठे सरदारांच्या मदतीने स्वराज्य उभारले. त्यातील बडोद्याचे गायकवाड हे एक होते. इ.स. १७२० ला त्यांनी मराठे शाहीच्या एका सुभ्याची मुहूर्तमेढ रोवली. ती गढी स्वातंत्र्यापर्यंत म्हणजे २२७ वर्षे ताठ मानेने उभी राहिली. या प्रवासातील एक मैलाचा दगड होते स्वच्छ चारित्र्याचे, निर्व्यसनी सौर्वभौम राजा सयाजीराव गायकवाड. हा इतिहासही समजून घेणे आजची गरज आहे.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक ‘क्रांतीपर्व’ - आंबेडकर
 - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
 - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
 - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
 - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
 गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
 - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
 - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
 - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
 - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
 - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
 - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
 कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
 परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
 - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
 जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
 राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

● महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.

● सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि.,११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com